नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १०९ Issue - 109 | वार - रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ Blow- Sunday Date 13 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सीमेवर शांतता आणि स्थैर्य हीच द्विपक्षीय संबंधांची प्राथमिक अट

### पंतप्रधान मोदींचा चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेत स्पष्ट संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आणि चीन संबंधांमध्ये सुधारणा व सहकार्याचा नवा अध्याय सुरू करण्याच्या प्रयत्नांदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत सीमेवरील शांतता आणि स्थैर्याचा मुद्दा अत्यंत ठामपणे मांडला आहे. ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या महत्त्वपूर्ण चर्चेत, सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता कायम राहणे हे दोन्ही देशांमधील संबंधांच्या सातत्यपूर्ण विकासासाठी आवश्यक पाया असल्याचे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.



विद्यमान करारांचे पालन आणि तीन तत्त्वांचा आग्रह:

चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी सीमा प्रश्नाशी संबंधित विद्यमान करार आणि दोन्ही देशांमधील परस्पर सम जुतींचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित केली. सीमा प्रश्नावर तोडगा काढण्याच्या प्रक्रियेत ठरलेल्या व्यवस्थांचा सन्मान करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, भारत आणि चीनच्या संबंधांमध्ये मतभेद असले तरी त्यांचे रूपांतर वादात होऊ नये, अशी ठाम भूमिका मांडत संबंध पुढे नेताना परस्पर आदर, परस्पर संवेदनशीलता आणि परस्पर हित या तीन मूलभूत तत्त्वांचे पालन झाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीचे वर्णन परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल यांनी 'सार्थक' असे केले आहे.

शी जिनपिंग यांची भूमिका आणि सहकार्यावर भर:

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी भारत आणि चीन हे जगातील दोन सर्वाधिक लोकसंख्या असलेले देश तसेच 'ग्लोबल साउथ'मधील महत्त्वाचे सदस्य असल्याचे नमूद केले. बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत दोन्ही देशांवर मोठी जबाबदारी असल्याचे सांगत त्यांनी ब्रिक्सच्या चौकटीत उच्च दर्जाचे सहकार्य वाढविण्याचे आवाहन केले. चीन भारतासोबतचे संबंध धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहतो, असे स्पष्ट करत दोन्ही देशांनी एकमेकांच्या सामर्थ्यांमधून शिकत सामायिक विकास साधावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. तियानजिन येथे झालेल्या मागील बैठकीनंतर भारत-चीन संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावाही दोन्ही नेत्यांनी घेतला.

निष्कर्ष व भविष्यातील दिशा:

सीमा प्रश्नावर न्याय्य, योग्य आणि परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढण्याच्या बांधिलकीचा पुनरुच्चार दोन्ही नेत्यांनी केला. या उच्चस्तरीय बैठकीतून भारताची भूमिका अत्यंत स्पष्ट झाली आहे-द्विपक्षीय संबंध सुधारण्यास भारताची संपूर्ण तयारी आहे, परंतु त्यासाठी सीमेवर शांतता आणि स्थैर्य ही प्राथमिक अट राहील. पंतप्रधान मोदींनी शी जिनपिंग यांचे भारतात स्वागत करताना भारताच्या ब्रिक्स अध्यक्षतेदरम्यान चीनकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आणि त्यानंतर विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

## १९ सप्टेंबरला मनोज जरांगे पाटील मुंबईत धडकणार-आझाद मैदानात आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आरक्षणाच्या मागण्यांवर अद्याप तोडगा न निघाल्याने मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत धडक देण्याची घोषणा केली आहे. अंतरवाली सराटी येथून १५ सप्टेंबरला मराठा बांधवांचा मोर्चा मुंबईच्या दिशेने रवाना होणार असून, १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानात उपोषण सुरू करण्यात येणार आहे. आंदोलनाच्या मार्गावर बीडच्या पाटोदा, अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, पुण्यातील हडपसर आणि रायगडमधील खोपोली येथे मोर्चाचे मुक्काम असणार आहेत. मराठा-कुणबी दाखले रद्द होत असल्याचा आरोप करीत जरांगे पाटील यांनी विविध मागण्यांसाठी पुन्हा उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाचा शनिवारी १५ वा दिवस आहे. मागण्या मान्य न झाल्यास मुंबईत येऊन उपोषण करण्याचा इशारा त्यांनी यापूर्वीच दिला होता. आंदोलनावर अद्याप तोडगा न निघाल्याने त्यांनी आता मुंबईतील आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १५ सप्टेंबरला अंतरवाली सराटी येथून मोर्चा मुंबईच्या दिशेने रवाना होईल. त्याच दिवशी बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे पहिला मुक्काम असेल. १६ सप्टेंबरला अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे दुसरा मुक्काम, १७ सप्टेंबरला पुण्यातील हडपसर येथे तिसरा, तर १८ सप्टेंबरला रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे चौथा मुक्काम होणार आहे. त्यानंतर १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला सुरुवात केली जाणार आहे.

यापूर्वीही जरांगे पाटील यांनी मुंबईत मोठे आंदोलन केले होते. मात्र, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांनी ते आंदोलन मागे घेतले होते. आता पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा प्रश्न घेऊन जरांगे पाटील मुंबईत दाखल होणार आहेत. काही दिवसांपूर्वी भाजप आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. सरकारला त्यांच्या सर्व मागण्या मान्य असल्याचे सांगत लाड यांनी जरांगे यांनी उपोषण सोडावे, अशी विनंती केली होती. मात्र, या मागण्यांवर अद्याप ठोस तोडगा न निघाल्याने जरांगे यांचे उपोषण सुरूच आहे. त्यामुळे १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानात होणाऱ्या आंदोलनाबाबत सरकारची भूमिका काय राहते आणि त्यावर तोडगा कधी निघतो, याकडे आता लक्ष लागले आहे.

### गणेशोत्सवात आंदोलन करू नका : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**गणेशोत्सव काळात मुंबईत आंदोलन करणे हे मुंबईकर आणि राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेसाठी कठीण आहे. मुंबईत कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. राज्यातील सर्व आंदोलकांना विनंती राहील की, या काळात कुणी मुंबईत आंदोलन करणे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांनी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासात कधी न झालेले निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी घेतले आहेत. त्यामुळे या नेत्यांवर करण्यात येणारी टिप्पणी महाराष्ट्राला आणि समाजाला पटत नाही. मराठा समाजाला दिलेला न्याय हा देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या काळात मिळाला आहे. आंदोलकांना विनंती राहील की, गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत आंदोलन करणे योग्य नाही, असे मत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.**

## मोदी, पुतिन आणि शी जिनपिंग यांचे लक्षवेधी हस्तांदोलन; बदलत्या जागतिक राजकारणाचे संकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: नवी दिल्लीत सुरू असलेल्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील एकत्रित छायाचित्र आणि हस्तांदोलन संपूर्ण जगात चर्चेचा विषय ठरले आहे. तिन्ही नेत्यांचे हातात हात घेतलेले हे छायाचित्र सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले असून, बदलत्या जागतिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर त्याला विशेष राजनैतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या शिखर परिषदेमध्ये व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, जागतिक प्रशासनातील सुधारणा आणि 'ग्लोबल साउथ'चा आवाज अधिक प्रभावीपणे मांडण्यावर भर दिला जात आहे. ११ सदस्यीय ब्रिक्स संघटनेमध्ये जगातील जवळपास निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व होते. पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर शेअर केलेल्या छायाचित्रांमध्ये पुतिन आणि शी जिनपिंग यांच्यासह इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान आणि इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यासोबतचे क्षणही झळकले आहेत.

शिखर परिषदेच्या पूर्वसंध्येला (११ सप्टेंबर रोजी) पंतप्रधान मोदी आणि व्लादिमीर पुतिन यांच्यात महत्त्वाची द्विपक्षीय बैठक पार पडली. यामध्ये राजकीय, आर्थिक, संरक्षण, ऊर्जा आणि अंतराळ या क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेण्यात आला. दोन्ही देशांमधील व्यापार वाढवण्यासाठी २०३० पर्यंतच्या आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर चर्चा झाली. तसेच, पुतिन यांनी पंतप्रधान मोदींना रशिया भेटीचे दिलेले आमंत्रण मोदींनी स्वीकारले आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग शनिवार, १२ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत दाखल झाले.

## वाळू लिलाव धोरणात राज्य सरकारकडून बदल ई-लिलावासोबत ई-निविदा पद्धत बंधनकारक

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जारी केल्या नवीन मार्गदर्शक सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वाळू आणि रेती घाटांच्या लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याबरोबरच अनधिकृत उत्खननाला आळा घालण्यासाठी राज्य सरकारने वाळू निर्गती धोरणात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. सुधारित नियमांनुसार वाळू घाटांच्या लिलावासाठी ई-लिलावासोबत ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक करण्यात आले असून, तीन फेऱ्यांची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार सुधारित धोरणाबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. (डरपव चळप-ळपस चरहरीरीहीर)

नवीन नियमांनुसार, पर्यावरण परवानगी मिळालेल्या नदीपात्रातील सर्व वाळूघाटांचा तालुकानिहाय एकत्र लिलाव करण्यात येणार आहे. लिलाव विहित मुदतीत पूर्ण व्हावा यासाठी बोलीच्या फेऱ्यांचे निकषही निश्चित करण्यात आले आहेत. पहिल्या फेरीत किमान तीन, दुसऱ्या फेरीत किमान दोन, तर तिसऱ्या फेरीत किमान एक पात्र निविदाधारक असणे आवश्यक राहणार आहे. तीनही फेऱ्यांनंतरही लिलाव न झाल्यास संबंधित वाळू गट स्थानिक वापरासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत.

यापूर्वीच्या धोरणात दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीसाठीची कालमर्यादा तसेच आवश्यक निविदाधारकांच्या संख्येबाबत स्पष्टता नव्हती. त्यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये लिलावासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जात होता. परिणामी लिलाव प्रक्रियेला विलंब होऊन शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर सुधारित नियम लागू करण्यात आले आहेत. सर्वाधिक बोली लावणाऱ्या एच-१ निविदाधारकाने विहित मुदतीत उर्वरित रक्कम भरली नाही, तर त्यानंतर एच-२ आणि एच-३ निविदाधारकांना त्याच दराने संधी देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वाधिक बोलीदाराकडून व्यवहार पूर्ण न झाल्यास पुढील पात्र निविदाधारकांमार्फत प्रक्रिया पूर्ण करण्याचा मार्ग खुला राहणार आहे.

लिलाव प्रक्रियेतील तांत्रिक तपासणीदरम्यान काही स्पर्धकांची कागदपत्रे अपूर्ण आढळल्यास त्यांना महाटेंडर पोर्टलवर आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यासाठी एक दिवसाची अतिरिक्त मुदत देण्यात येणार आहे. त्यामुळे तांत्रिक कारणांमुळे पात्र स्पर्धक प्रक्रिया बाहेर जाण्याची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दरम्यान, वाळू धोरणातील यापूर्वीचे सर्वसाधारण वेळापत्रक रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हानिहाय कालबद्ध नियोजन करून विहित मुदतीत लिलावासंदर्भातील सर्व कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### म्हाडा उपविभाग सोलापूर अंतर्गत २३८ सदनिकांची सोडत कार्यक्रम उत्साहात

### १२६ अत्यल्प उत्पन्न गट आणि ११२ अल्प उत्पन्न गटातील सदनिकांचा समावेश

## २४ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पत्रकारांच्या घरांचे स्वप्न साकारले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : दोन तपांहून अधिक काळापासून प्रतीक्षेत असलेल्या पत्रकारांच्या हक्काच्या घरांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने शनिवारी महत्त्वाचे पाऊल पडले. पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा) उपविभाग सोलापूरअंतर्गत सी.एस. क्र. २३२ येथे प्रधानमंत्री आवास योजनेत बांधण्यात आलेल्या २३८ सदनिकांची सोडत मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली. यामध्ये १२६ अत्यल्प उत्पन्न गट आणि ११२ अल्प उत्पन्न गटातील सदनिकांचा समावेश आहे.



या कार्यक्रमास राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे, लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, उपमुख्य अधिकारी पुणे मंडळ राहुल शिळीमकर, प्र कार्यकारी अभियंता पुणे मंडळ मिलिंद अटकळे, मिळकत व्यवस्थापक रूपेश जयभाये, सोलापूर उपविभाग सूरज अजनाळकर , सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख, महाराष्ट्र राज्य पत्रकार अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रमोद बोडके यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार देवेंद्र कोठे यांनी पत्रकार संघटनांनी तब्बल २४ वर्षे केलेल्या पाठपुराव्याचा उल्लेख केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात जागा निश्चित होऊन भूमिपूजन झाल्याचे सांगत, पत्रकारांना घर मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. सोडत प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच गुढीपाडव्यापूर्वी पत्रकारांच्या हातात घराची चावी देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकारांच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करत सदनिकांची किंमत आणखी कमी करण्यासाठी शासन, सीएसआर आणि इतर माध्यमांतून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. पत्रकारांसाठीचा हा प्रकल्प देशातील पहिला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी पत्रकार म्हणून आपल्या कारकिर्दीतील आठवणी सांगत, बाह्य सुविधांसाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याचे सांगितले. या निधीमुळे प्रत्येक सदनिकेची किंमत सुमारे २ ते २.५ लाख रुपयांनी कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक उपमुख्य अधिकारी पुणे मंडळ राहुल शिळीमकर यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले. यावेळी म्हाडाचे सोमनाथ रावळे, गोरक्षनाथ कुलट, बालकृष्ण दावनपल्ली , प्रमोद शिंदे , सतीश लष्करे , हरिदास देशमुख , सुमित उभाळे, वर्षा घोरपडे, सुनीता गोडसे यांच्यासह म्हाडाचे अधिकारी तसेच सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार स्वतःची समस्या कधी सांगत नाहीत : जिल्हाधिकारी

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी पत्रकार समाजातील प्रत्येक घटकाच्या समस्या मांडत असले तरी स्वतःच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. सोलापुरात पदभार स्वीकारल्यानंतर पत्रकारांच्या आवासाचा विषय प्राधान्यक्रमात घेतला. लवकरात लवकर, गुढीपाडव्याच्या अगोदरच तुमच्या नव्या घरात प्रवेश व्हावा आणि घरात दूध उकळण्याचा मंगल कार्यक्रम व्हावा, हीच माझी मनापासून इच्छा आहे. आमच्या तामिळनाडूमध्ये नव्या घरात प्रवेश करताना दूध उकळण्याची परंपरा आहे. आपल्या इथेही हा मंगल सोहळा लवकरच तुमच्या घरात व्हावा, असे ते म्हणाले.

पत्रकारांचे ग्लॅमर कायम, अपवाद फक्त आर्थिक : आ. कल्याणशेट्टी

पत्रकारांचे माझ्या राजकीय जीवनात मोठे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा मी नेहमी आदर करतो. राजकारण्यांचे ग्लॅमर पाच-दहा वर्षांचे असते मात्र पत्रकारांचे ग्लॅमर कायम असते, अपवाद फक्त आर्थिक परिस्थितीचा! समाजासाठी धावणारे पत्रकार अनेकदा स्वतःच्या कुटुंबाकडे आणि घराच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या कुटुंबालाही स्वतःचे घर असावे अशी अपेक्षा असते, असे आ. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले.

# सकारात्मक विचार : जीवनाचा आशावादी दृष्टिकोन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(१३-१९ सप्टेंबर: जागतिक सकारात्मक विचार दिवस सप्ताह.)

सकारात्मक विचारांचा दिवस दरवर्षी १३ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश सकारात्मक विचारधारेचे महत्त्व लोकांना समजावणे आहे. सकारात्मक विचारधारा म्हणजे जीवनातील समस्या आणि आव्हानांकडे आशावादी दृष्टीकोनातून पाहणे आणि त्यातून शिकण्याचा प्रयत्न करणे. हा दिवस प्रत्येकाला आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवण्याची आणि ते सकारात्मक करण्याची आठवण करून देतो. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर मार्गदर्शक लेख अभ्यासुया.... संपादक.

सकारात्मकविचारधाराआपल्याला शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे अनेक फायदे देते. यामुळे तणाव कमी होतो, आत्मविश्वास वाढतो, आणि जीवनात चांगल्या संधी निर्माण होतात. जेव्हा आपण सकारात्मक विचार करतो, तेव्हा आपल्याला समस्यांवर उत्तम तोडगा मिळतो, आणि आपले संबंधही अधिक सुदृढ होतात. तसेच, सकारात्मक विचारधारा आपल्याला अपयशाचा सामना करण्याची ताकद देते आणि जीवनातील खडतर काळातही आपल्याला प्रेरित ठेवते. सकारात्मक विचारांशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आपल्या जीवनात आलेले नैराश्य, अंधार आपण सकारात्मक विचारांच्या शक्तीने पून्हा नव्या उमेदीने जीवन जगून आपल्या आयुष्यात आलेला अंधार दूर करु शकतो. आपल्या विचारांवर आपलेच नियंत्रण असल्याने आपल्यालाच ठरवायचे आहे, की सकारात्मक विचार करायचा आहे, की नकारात्मक? मात्र तरीही नकारात्मकच विचारच आपण जास्त करतो. आजपासून आपण नेहमी सकारात्मकच विचार करुया.

विचार दोन प्रकारचे:

आपल्या मनातील विचार हे दोन प्रकारचे असतात- १) सकारात्मक विचार, आणि २) नकारात्मक विचार. या विचारांवर आपला दृष्टिकोन किंवा व्यवहार अवलंबून असतो. विशेष म्हणजे आपण जसा विचार करतो, तसे बनतो. म्हणूनच म्हटले जाते, की आपला जसा विचार असतो तसेच आपले आचरणदेखील असते. मग आचरण कसे ठेवायचे हे मुळात आपल्यावर अवलंबून असते. आपण कोणत्या रंगाचा चष्मा लावला आहे? आपण जर काळ्या रंगाचा चष्मा लावला असेल तर सर्वत्र काळेच काळे दिसेल आणि लाल रंगाचा असेल तर लालच लाल दिसेल, नाही का? याचप्रकारे नकारात्मक विचारांमुळे आपल्याला सर्वत्र नैराश्य, दु:ख आणि असंतोष दिसते आणि सकारात्मक विचारांनी आपल्याला कायम आशा, सुख आणि समाधानच दिसते.

आता आपण हे ठरवायचे आहे, की सकारात्मक चष्मा लावून जगाकडे पाहायचे, की नकारात्मक चष्म्याने पाहायचे? जर आपण सकारात्मकतेचा चष्मा लावला असेल तर आपल्याला प्रत्येक व्यक्ति चांगला वाटेल आणि जर नकारात्मक चष्मा लावला असेल तर आपल्याला सर्वत्र वाईटच दिसेल, आणि कालांतराने आपणही तसेच बनू.

कसे बनाल सकारात्मक?

सकारात्मकतेची सुरूवात आशा आणि विश्वासाने होत असते. कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास हा गमवायचा नाही आणि नेहमी आशावादी राहायचे. एका ठिकाणी चारही बाजूंनी अंधार असेल आणि काहीच दिसत नसेल, तर त्याठिकाणी आपण एक लहानसा दिवा लावला तर त्या दिव्यामुळे एका क्षणात सर्वत्र पसरलेला अंधार दूर होईल. याचप्रकारे आशेचे किरण म्हणजेच सकारात्मक विचार



सर्व नकारात्मक विचारांना एका क्षणात मिटवून टाकतात. नकारात्मकतेला नकारात्मक गोष्ट नष्ट करु शकत नाही, नकारात्मकतेला केवळ सकारात्मक गोष्टच नष्ट करू शकते. यासाठी जेव्हाही नकारात्मक विचार मनात येईल, त्याचवेळी सकारात्मक विचारात त्याचे परिवर्तन व्हायला हवे. सकारात्मक बनण्यासाठी काही टिप्स: ॰ जीवनात नेहमी चांगलेच शोधा, न्युनगंड बाळगू नका. संकटांच्या बाबतीत विचार न करता आपल्यातील बलस्थानांच्या बाबतीत विचार करा, ज्यांच्या आधारे आपण त्या समस्या सोडवू शकू. ॰ दुसऱ्यांजवळ काय आहे? याबाबत काळजी न करता आपल्याजवळ जे काही त्यात समाधानी रहा. हा सकारात्मक दृष्टिकोन आपल्या जीवनातील नकारात्मता संपुष्टात आणेल. ॰ जे काम हाती घेतले आहे, ते पूर्ण करा. प्रत्येक काम अपूर्ण सोडले, तर आपल्या जीवनात नकारात्मक विचार प्रवेश करतात. ॰ नेहमी काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा. जे पण काम आपल्या व्यवसायाशी संबंधीत आहे आणि आपल्याला ते काम येत नसेल, तर ते नक्की शिका. असे केल्याने आपण आपल्या कामात परिपूर्ण बनाल आणि आपल्या जीवनात सकारात्मक उर्जा संचारेल. ॰ वेळोवेळी निस्वार्थ भावनेने परक्या व्यक्तिंची मदत करुन पहा. असे केल्याने आपला सामाजिक दृष्टिकोन वाढेल आणि आपल्याबरोबरच समाजात सकारात्मक उर्जेचा प्रवाह प्रवाहित होईल. ॰ जे लोक नेहमी नकारात्मक विचार करतात किंवा नेहमी भांडणे, शंका करतात, त्यांच्यापासून चार हात लांबच रहा. ॰ सकारात्मक विचारसरणी बळावण्यासाठी नेहमी ध्यानधारणा करा आणि सकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तिंच्या संपर्कात रहा. ॰ प्रत्येक दिवशी एक नवे ध्येय निश्चित करुन कामास सुरूवात करा आणि त्या ध्येयाला नक्की पूर्ण करा. असे केल्याने आपले जीवन सकारात्मकतेकडे वाटचाल करण्यास सुरुवात करेल.

दरवर्षी १३ सप्टेंबर हा दिवस विश्व सकारात्मक विचार दिन म्हणून साजरा केला जातो.

सकारात्मक विचार दिनाबद्दल थोडक्यात महत्त्वाचे- १) उद्देश: मनातील नकारात्मकता दूर करून आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनवणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

२) सुरुवात: २००३ मध्ये एका अमेरिकन उद्योजकाने या दिवसाची सुरुवात केली होती. ३) महत्व: सकारात्मक विचारांमुळे ताणतणाव कमी होतो, मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारते आणि आत्मविश्वासात वाढतो.

सकारात्मक राहण्याचे सोपे मार्ग- १) सकाळची सुरुवात: दररोज सकाळी उठल्यावर चांगल्या व प्रेरणादायी विचारांनी दिवसाची सुरुवात करा. २) स्व-संवाद: मी प्रत्येक परिस्थिती शांतपणे हाताळू शकतो अशी सकारात्मक वाक्ये स्वत:ला सांगा. ३) स्वीकार: ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात नाहीत, त्यांचा शांतपणे स्वीकार करायला शिका. ४) कृतज्ञता: आपल्याकडे जे आहे त्याबद्दल समाधानी राहा आणि प्रत्येक छोट्या आनंदाची कदर करा.... विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!!! आंतरराष्ट्रीय सकारात्मक दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

**– संकलन व सुलेखन –**

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

**(दिनविशेषकार)**

**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

**फक्त मधुभाष: ९६९९८३६७१७.**

# लघु नाटिकेतून सायबर सुरक्षेचा संदेश २१०० महिलांना सायबर सुरक्षेचे धडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : दिनांक ३ सप्टेंबर २०२६ सायबर फसवणुकीच्या विविध प्रकाराबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी लघु नाटिकेद्वारे जनजागृती करण्यात आली व सायबर फसवणूक झाल्यावर तातडीने १९३० चा हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा त्याचप्रमाणे विविध उपाय याप्रसंगी सुचवण्यात आले.

हा कार्यक्रम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या स्कूल ऑफ कॉम्पिटिशन सायन्सेस आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षाअंतर्गत नागनाथ कार्यालय तळवळी येथे घेण्यात आल्या हा उपक्रम श्री गणेश लोक संचालित साधन केंद्र मोहोळ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात श्री गणेश लोकसंचालित साधन केंद्राच्या सुमारे २१०० महिला सदस्यांनी उस्फुर्त उपस्थित नोंदवली व कार्यक्रमाच्या प्रारंभी स्कूल ऑफ कॉम्पिटिशन सायन्सचे डॉक्टर राजकुमार मते, सायबर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी,

कार्यक्रमास आर्थिक विकास महामंडळ सोलापूरचे जिल्हा समन्वयक मन्सूर पटेल, पंचायत समितीचे मोहोळ उपसभापत सौ उल्का पाटील, व जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण दादा शिंदे, पंचायत समितीच्या सदस्या सौ नीलम ताई मासाळकर तसेच शिरापूरच्या सरपंच सौ वृषाली सावंत यांची उपस्थिती होती.

या उपक्रमासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू प्राध्यापक लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉक्टर अतुल लकडे तसेच क्लिक हिल फाउंडेशनच्या अनुपमा काटकर अजय शिर्के गायत्री केसरकर आणि दिपोसिंह यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉक्टर ज्योती माशाळे, डॉक्टर अशोक शिंदे डॉक्टर एसडी राऊत आणि डॉक्टर सी जी गार्डी यांनी सहकार्य केले व सूत्रसंचालन प्रणाली मासाळ व प्रतीक पाटोळे यांनी केले कुमारी अदिती पाटील हिने सर्वांना सायबर सुरक्षेची शपथ दिली तर आभार अमित सावंत यांनी मान्य व कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व सायबर व्हर्वर्स उपस्थित होते व अनिकेत कांबळे अर्शद दासरी श्रुती सलगर मृत्युंजय कोळी ओंकार बाबा नगरे कार्यक्रमाची थेट प्रक्षेपण केले.

# गुरुवार-शुक्रवारी वागदरीत श्री परमेश्वर आराधना (पर्व) पालखी महोत्सवाचा जागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी, ता. अक्कलकोट / प्रतिनिधी

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील ग्रामदैवत श्री परमेश्वर यांच्या आराधना (पर्व) पालखी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली असून, बुधवार दि. १६ सप्टेंबरपासून शुक्रवार दि. १८ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक, सांस्कृतिक व पारंपरिक

**भव्य पालखी मिरवणूक, अखंड अन्नदान, भक्तिगीत, भारूड व पारंपरिक कलाविष्कारांचे आयोजन**

कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार व शुक्रवार या दोन दिवसांत होणाऱ्या भव्य पालखी मिरवणुकीसाठी पंचक्रोशीतील भाविकांसह परगावाहून येणाऱ्या विविध कलापथकांची उपस्थिती राहणार आहे.

सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री परमेश्वर आराधना पर्व मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येणार आहे. बुधवार दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.२४ ते रात्री ९.४६ या वेळेत कंटली पूजनाचा धार्मिक कार्यक्रम होणार आहे.

गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.१५ ते सकाळी ८.३० या वेळेत श्रींचा महारुद्राभिषेक होणार आहे. हा धार्मिक विधी श्री. म.नि.प्र. शिवलिंगेश्वर महास्वामीजी, विरक्त मठ वागदरी यांच्या अमृतहस्ते, तसेच श्री ष.ब्र. वीरमहांत शिवाचार्य, महांतेश्वर मठ, चिन्मयगिरी चौडापूर, ता. अफजलपूर, जि. कलबुर्गी यांच्या दिव्य सान्निध्यात संपन्न होणार आहे.

यानंतर सकाळी १०.३० ते दुपारी १.१५ या वेळेत भव्य अंबील घागर मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर महाप्रसाद, श्रींचे दर्शन व आशीर्वचनाचा कार्यक्रम होईल. दुपारी १ ते सायंकाळी ६ या वेळेत भक्तिगीतांचा संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गुरुवारी रात्री ९ वाजता परगावाहून विविध संघांचे आगमन होणार असून, भव्य भारूड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९ वाजता श्री बिरलिंगेश्वर डोळ्ळीन गायन संघ, निलूर, ता. अफजलपूर, जि. कलबुर्गी यांचा गायन कार्यक्रम होणार आहे. यामध्ये मुख्य गायिका अंबिका निलूर, मास्तर उमेश व मास्तर गब्युरवाडी यांचा सहभाग राहणार आहे. तसेच श्री अमोगसिद्धेश्वर गायन संघ, गुणकी, जि. विजयपूर यांचा कार्यक्रम होणार असून मुख्य गायक



अभिषेक गुणकी, मास्तर सुरेश व मास्तर गुणकी सहभागी होणार आहेत. रात्री ११ वाजता गोंधळी नाटकाचा कार्यक्रम होणार आहे.

शुक्रवारी भव्य पालखी मिरवणूक

शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी दुपारी १ ते १.१५ या वेळेत म.नि.प्र. श्री शिवलिंगेश्वर महास्वामीजी, श्री हुच्वेश्वर विरक्त मठ, निंबर्गा, ता. आळंद, जि. कलबुर्गी यांच्या शुभहस्ते श्रींची पालखी पूजा होणार आहे. त्यानंतर श्री परमेश्वर मंदिरापासून श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या मिरवणुकीत गावातील तसेच परगावाहून येणारे लेझीम, टिपरी, डफली, ढोल, झांज पथक, मल्लखांब, भजन मंडळ, नंदीध्वज, नगारावाद्य, बहुरूपी व भारूड पथक सहभागी होणार आहेत. पारंपरिक वाद्ये, लोककला आणि भक्तिमय वातावरणामुळे पालखी मिरवणुकीला विशेष रंगत येणार आहे.

शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री ९.३९ वाजता पालखीला सुहासिनींची महाआरती होणार आहे.

दोन दिवस अखंड अन्नदान

श्री परमेश्वर आराधना पर्वानिमित्त दोन दिवस अखंड अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या अन्नदान सेवेसाठी स्वेच्छेने देणगी देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी पंचकमिटीशी संपर्क साधावा, असे आवाहन पंचकमिटीचे प्रमुख राजकुमार निंबाळे यांनी केले आहे.

श्री परमेश्वर आराधना पर्वाच्या निमित्ताने वागदरी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री परमेश्वरांचे दर्शन, पालखी मिरवणूक आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सासवड पोलीस सज्ज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सासवड शहरातील बसस्थानक परिसरात दंगा काबू योजनेचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या वेळी सहा पोलिस अधिकारी आणि १८ पोलिस अंमलदारांनी सहभाग घेत प्रत्यक्ष सराव केला. याबाबत वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष घोळवे यांनी माहिती दिली.

गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होते. यामुळे संभाव्य तणावपूर्ण परिस्थितीला तातडीने सामोरे जाण्यासाठी पोलिस दलाची तयारी तपासण्यात आली. जमाव नियंत्रण, परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळविणे, पोलिस अधिकारी व अंमलदारांमध्ये समन्वय राखणे तसेच संवेदनशील प्रसंगी कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने या रंगीत तालमीत सराव करण्यात आला. गणेशोत्सव हा सामाजिक एकोपा आणि बंधुभावाचा उत्सव आहे. त्यामुळे भक्तीच्या वातावरणाला गालबोट लागू नये, कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि नागरिकांना सुरक्षित वातावरणात उत्सव साजरा करता यावा, यासाठी पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे.

# स्वेरी व एस.व्ही.आय.टी. चा संयुक्त उपक्रम; रविवारी कुर्डुवाडीत 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः

शिक्षणातील नवनवीन उपक्रमासाठी राज्यात प्रसिद्ध असलेल्या गोपाळपूर येथील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट व खेड (ता. उत्तर सोलापूर ) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या वतीने माढा, बार्शी व करमाळा या तीन तालुक्यांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ०१:३० वाजता) कुर्डुवाडीतील 'तुळजाई लॉन्स अँड लॉजिंग' बार्शी नाका, करमाळा रोड याठिकाणी आयोजित केल्याची माहिती स्वेरी, पंढरपूर व एस.व्ही.आय.टी. सोलापूरच्या संयोजन समितीने दिली.




या 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार वितरण' सोहळ्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्याविकास मंडळ करमाळ्याचे सचिव विलास घुमरे हे असणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बार्शीतील झाडबुके शिक्षण संस्थेच्या संचालिका सौ. वर्षाताई ठोंबरे, श्री. भैरवनाथ प्रतिष्ठान करमाळ्याचे संस्थापक अध्यक्ष सेवानिवृत्त प्राचार्य प्रा. जयप्रकाश बिले, शिवाजी शिक्षण मंडळ बार्शीचे खजिनदार जयकुमार शितोळे, कुर्डुवाडीच्या श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे संस्थापक डॉ. एम. पी. सुरवसे, जगदंबा ग्रुप सर्जापूरचे अध्यक्ष डॉ. कपिल कोरके, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे अध्यक्ष अरुण बारबोले, कुर्डूवाडीतील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास, कै. विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णीचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, कुर्डुवाडीतील आदिशक्ती शिक्षण संस्था वेताळवाडी संचलित आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, विद्यामंदिर संस्था वैरागचे अध्यक्ष भूषण भूमकर, सुयश विद्यालय बार्शीचे संस्थापक शिवदास नलावडे, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्थेचे अरुण कापसे, अर्णव शिक्षण संकुल वैरागचे सचिव रविंद्र कापसे, नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ माळेगावचे संचालक विलास मिरगणे, बालाजी बहुउद्देशीय संस्था चिकलठाणचे डॉ. ब्रिजेश बारकुंड, गुरुकुल विद्यालय पांडेचे अध्यक्ष नितीन भोगे, भारत शिक्षण प्रसारक मंडळ जेऊरचे सचिव अर्जुनराव सरक, संस्थाचालक संघटना सोलापूरचे सचिव बापू निळ, शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाबारावजी गायकवाड, तुळजाभवानी महिला मंडळाचे अध्यक्ष निलेश गायकवाड, बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नितीन कवठाळे यांच्यासह तिन्ही तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षकवृंद उपस्थित राहणार आहेत. स्वेरीचे संस्थापक व स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ बी.पी. रोंगे हे समन्वयक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तरी यासाठी तिन्ही तालुक्यातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित असणार्या सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीने केलेले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मावेजा वाटपात दुजाभाव न करता टॉवर लाईन मुळे बाधित जमिनीचा अपुरा मावेजा वाढवून समान दराने मावेजा द्यावा : वागदरी येथील शेतकऱ्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड) : सोलार क्राफ्ट इंडिया ७ प्रायव्हेट लिमिटेड कंपनी च्या टावर उभारणीमुळे व टॉवर लाईनमुळे बाधिती जमिनीचा अपूरा मावेजा वाढवून शेतकऱ्यांमध्ये दुजाभाव न करता समान दराने मावेजा द्यावा अशी मागणी वागदरी ता.तुळजापूर येथील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय धाराशिव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




याबाबत वागदरी ता. तुळजापूर येथील शेतकरी रावण राजेंद्र पवार, शिवराम विश्वंभर पवार, संजय विश्वंभर पवार,बाळू विश्वंभर पवार राहणार वागदरी ता.तुळजापूर यांनी उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी धाराशिव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की श्री मोहम्मद यहया ऑथराईजड सिग्निटरी सोलार क्राफ्ट इंडिया ७ प्रायव्हेट लिमिटेड (ब्लूपाईन ) या सोलार कंपनी ने आमच्या मालकी हक्काच्या गट नं ६० मधिल शेत जमिनीतून (१३२र्ज्ञी, २२र्ज्ञी, ४र्घी) क्षमतेचे उच्चदाब विद्यूत वाहिनी घेवून गेली आहे.सदर कंपनीचा आमच्या क्षेत्रात टॉवर उभारला असून विद्यूत वहाक तारा आमच्या पपईच्या बागेवरून व ऊसाच्या पिकावरून गेल्या आहेत. त्याच तारेखाली बोअरवेल व बोअरवेचे पाईप आहेत. तर संजय विश्वंभर पवार यांची स्वतंत्र बोअरवेल आहे.आपल्या टॉवरमुळे व विद्यूत वहाक तारे मुळे आमच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे व पुढे होणार आहे.



आमच्या शेतातून गेलेल्या टॉवर व टॉवर लाईन मुळे बाधित झालेल्या जमिनीचा दिलेला मावेजा हा अपुरा असून याच शिवारातील काही शेतकऱ्यांना आमच्यापेक्षा जास्त मावेजा दिलेला असून त्याचे पुरावे आमच्याकडे आहेत तरी शेतकऱ्यांमध्ये असा दुजाभाव न करता भारतीय टेलिग्राम कायदा १८८५ कलम १० आणि विद्युत कायदा कलम २००३ ६०/ ६ ८ अन्वये टॉवरच्या पायासाठी बाजारभावाच्या मूल्यांकप्रमाणे सरसकट १००% दराने तर कॅरीडोर (तारेखाली) साठी ५० टक्के दराने व पपई पिकांच्या तीन वर्षाचे उत्पादन गृहीत धरून वेगळा मावेजा वाढवून सर्व शेतकऱ्यांना द्यावा.अन्यथा या संदर्भात आंदोलन करण्यात येईल.

उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालय धाराशिव यांना देण्यात आलेल्या निवेदनावर रावण राजेंद्र पवार शिवराम विश्वंभर पवार संजय विश्वंभर पवार बाळू विशंभर पवार आधी शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे नेते अँड. अमोल पाटील उपस्थित होते.

# खाजगी रुग्णालयांनी तांत्रिक अडचणी लेखी कळवाव्यात; ज्येष्ठ नागरिकांसाठी शिबिरे घ्यावीत - अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी

## महात्मा फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत योजनेच्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण खाजगी रुग्णालयांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी लेखी स्वरूपात शासनास कळवाव्यात. तसेच वय वंदन कार्डसाठी शहरी व ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या.



महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांच्या जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीतील योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. गेल्या सहा महिन्यांत शासकीय व खाजगी रुग्णालयांद्वारे रुग्णांना मिळालेला लाभ, प्रलंबित प्रकरणे, कर्नाटक सीमावर्ती भागातील रुग्णांच्या अडचणी, आयुष्मान कार्ड, ई-केवायसी आणि ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या वय वंदना कार्डबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी श्री. निऱ्हाळी यांनी आशा वर्कर व विस्तार अधिकाऱ्यांना या योजनेत सहभागी करून घेण्याबाबत सर्व तहसीलदारांना पत्राद्वारे कळविण्याचे आणि रुग्णांचे रेशन कार्ड ऑनलाईन करून घेण्याचे निर्देश दिले. जनतेला प्रत्यक्ष लाभ झाला तरच ही योजना यशस्वी होईल, त्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक जिल्हा समन्वयक डॉ. प्रवीण गुंजाळ यांनी केले. त्यांनी जिल्ह्यातील योजनेच्या सद्यस्थितीची माहिती दिली. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य हनुमंत कुंभार यांनी ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी व माहितीअभावी वय वंदन कार्डपासून वंचित राहण्याबाबतच्या समस्या मांडल्या.

या बैठकीस निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य हनुमंत कुंभार, जिल्हा समन्वयक डॉ. प्रवीण गुंजाळ, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ तसेच शहरातील अंगीकृत खाजगी रुग्णालयांचे प्रतिनिधी व ग्रामीण भागातील रुग्णालयांचे प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांचा डोहोळेपाडा शाळेत सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

ठाणे जिल्हा परिषदेमार्फत ग्राम पंचायत अधिकारी म्हणून विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी परेश कांचन सोनावणे यांचा डोहोळेपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला भावनिक वातावरणाची किनार लाभली. सत्काराला उत्तर देताना परेश सोनावणे यांनी आपल्या यशामागे दिवंगत आजी हिराबाई दूंदाजी सोनावणे यांच्या संस्कारांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. आजीच्या आठवणींना उजाळा देताना ते भावूक झाले. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या छोटेखानी मुलाखतीतही त्यांनी आपल्या जीवनातील आजीचे स्थान सांगत विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले. सोनावणे यांनी मागील महिन्यात स्वतःच्या पुढाकारातून २५ हजार रुपयांची आर्थिक मदत शाळेला देत वाचनालय उभारणीसाठी हातभार लावला होता. याच सामाजिक बांधिलकीचा पुढचा टप्पा म्हणून या सन्मान सोहळ्याचे औचित्य साधत त्यांच्या पुतणीने आपल्या आजीच्या, दिवंगत हिराबाई दूंदाजी सोनावणे यांच्या स्मरणार्थ शाळेतील सर्व ६० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या किटचे वाटप केले. या उपक्रमातून पुरस्काराचा गौरव केवळ वैयक्तिक न राहता तो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी जोडला गेला. त्यामुळे उपस्थितांनी सोनावणे यांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि लोकसेवेच्या भावनेचे विशेष कौतुक केले. सन्मान सोहळ्याला ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शुद्धोधन जाधव, ग्राम पंचायत कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक चंद्रशेखर ढेंगळे, सहशिक्षिका संगिता ढेंगळे, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी परेश सोनावणे यांच्या कार्यशैलीचे, सामाजिक जाणीवांचे आणि लोकाभिमुख कामाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळेस त्यांची पुतणी दित्या सोनावणे सुद्धा उपस्थित होती. पुरस्काराचा सन्मान, आजीच्या संस्कारांची आठवण आणि विद्यार्थ्यांसाठी केलेली मदत-या तिन्ही भावनांचा सुंदर संगम ठरलेला हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.



**आजीच्या संस्कारांना उजाळा देताना परेश सोनावणे भावूक; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप**

# दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर कर्जासाठी बँकांनी सहकार्य करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : प्रतिनिधी

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. शेतीच्या कामांसाठी ट्रॅक्टरची आवश्यकता असतानाही आर्थिक परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदी करणे शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीसाठी आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध व्हावी, यासाठी फाटे ट्रॅक्टर्सच्या वतीने विविध बँका व वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली.




या बैठकीत शेतकऱ्यांची सध्याची आर्थिक परिस्थिती, ट्रॅक्टर कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी तसेच कर्ज मंजुरी प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून देताना बँका व वित्तीय संस्थांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, कर्ज प्रक्रिया सुलभ करावी आणि शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन फाटे ट्रॅक्टर्सच्या वतीने करण्यात आले.

बैठकीस न्यू हॉलंड कंपनीचे टेरिटरी मॅनेजर सचिन वडवले यांच्यासह क्सिस बँकेचे संदीप वाघमारे, इंडसइंड बँकेचे अरबाज शेख, एयू स्मॉल फायनान्स बँकेचे मयूर चिखलकर, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे अमोल शिंदे, एल अँड टी फायनान्सचे जमीर बागवान व टायगर कॅपिटलचे लक्ष्मण मेहतराव उपस्थित होते.

**फाटे ट्रॅक्टर्समध्ये विविध बँका व वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक**

यावेळी फाटे ट्रॅक्टर्सचे डीलर नागेश फाटे, रमेश फाटे, शुभम फाटे, शशांक फाटे तसेच सेल्स मॅनेजर संतोष पुणेकर उपस्थित होते. उपस्थित बँक अधिकारी व वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींचा फाटे ट्रॅक्टर्सच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतीची कामे सुरळीतपणे करता यावीत आणि आधुनिक शेतीसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध व्हावी, यासाठी बँकांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे, अशी अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**सादरीकरणाचे होते कौतुक : झडत्यांचे आजही महत्त्व कायम**

**विदर्भ आणि खान्देश भागात बैलपोळ्याच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो.**

# पोळ्याच्या पारंपरिक झडत्याही लोककलेचा भाग ठरतात







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया :

आपला महाराष्ट्र हा कला व साहित्याचा वारसा जोपासणारा समृद्ध प्रदेश आहे. सर्व प्रकारचे साहित्य निर्माण करणारी मंडळी आहेत. या संपूर्ण साहित्याचा आढावा घेत असतानी लोकसाहित्याचा विचार व अभ्यास होणे आवश्यक आहे. अशाच एका लोकसाहित्याचा विचार समृद्ध केला. ते साहित्य म्हणजे पोळा सणाच्या झडत्या, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात हे साहित्य टिकले हे अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणून पोळ्याच्या पारंपरिक झडत्याही लोककलेचा भाग ठरतात.

पोळ्याच्या झडत्या बैलपोळा सणादरम्यान बैलांच्या सन्मानार्थ, निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि सामाजिक परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी खड्या आवाजात म्हटल्या जाणाऱ्या पारंपरिक लोकगीतांना किंवा यमकबद्ध रचनांना 'झडत्या' असे म्हणतात. हा लोककला प्रकार प्रामुख्याने विदर्भ आणि खान्देश भागात बैलपोळ्याच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो.

> **ग्रामीण भागातील सण उत्सव हे साजरे करण्याची पारंपरिक पद्धत आहे. तसेच काही बाबी ह्या मानवी मूल्य जपाणा-या असतात. त्यात साहित्य हे अग्रेषित म्हणता येईल. मग साहित्यात लोककला व लोकसाहित्य हे ग्रामीण भागात पूर्वीपासून जपले जातात. हे ऐतिहासिक सत्य आहे. मला वाटते पारंपरिक झडत्या यांना लोकसाहित्याचा भाग समजून त्या प्रकाशात आणाव्या. म्हणजे लोकसाहित्यात आणखी भर पडेल.**
>
> **_ प्रा. एम. आर. नंदागवळी, (मराठी लोकसाहित्याचे अभ्यासक)**

झडत्यांचे स्वरूप आणि शीघ्रकाव्य असे वैशिष्ट्ये आहे. झडती हा एक प्रकारचा आशुकाव्य किंवा चारोळीसारखा प्रकार आहे. यात वेळेवर जमेल तशी जुळवाजुळव करून यमक जोडले जातात. एक नमन गौरा पार्वती, हर हर महादेव... अशा जयघोषाने होते.

पारंपरिक झडत्यांमध्ये देव-देवतांचे स्मरण, बैलांचे कौतुक असते. आधुनिक काळात शेतकरी आपल्या मनातील खदखद, राजकीय परिस्थिती, शेतीचे प्रश्न, महागाई आणि कर्जबाजारीपणा यावरही झडत्यांमधून विडंबनात्मक आणि मिश्किल भाष्य करतात.

> **मी गेल्या अनेक वर्षांपासून गावाच्या आकरावर (चौकात) पोळ्याला आंब्याची तोरण बांधतो. मारुती मंदिराजवळ गावकरी, शेतकरी बैलजोडी घेऊन एकत्र आले. की, मग झडत्यांना सुरुवात करतो. यामध्ये समस्यारहीत, बेरोजगारीवर मात करणारी, शेतक-यांचे दु:ख मांडणारी, सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी, सरकारवर टीका करणारी अशा झडत्या सादर केल्या जातात.**
>
> **खेमचंद रंगारी (झडती कलावंत, नवेगावबांध)**


सादर करण्याची पद्धत: पोळ्याच्या दिवशी संध्याकाळी जेव्हा गावातील सर्व बैलजोड्या मारुतीच्या देवळापाशी किंवा चौकात एकत्र येतात, तेव्हा तरुण आणि ज्येष्ठ शेतकरी खड्या आवाजात तालासुरत या झडत्या म्हणतात आणि इतर लोक त्याला दाद देतात.

पारंपरिक वंदना झडती:

एक नमन गौरा पार्वती, हर हर महादेव!वाटी रे वाटी खोबऱ्याची वाटी,
महादेव रडे दोन पैशासाठी!
पार्वती म्हणे रडू नका स्वामी,
तुमच्या नवसाला पावेन मी!

बैलांचे कौतुक करणारी झडती:
अंगण झाडीलं, पोढं सारवलं,
आमच्या सर्जा-राजाचं नाव गाजवलं!
शिंगे रंगविली बेगड लावून,
माझा राजा निघाला थाटात.

शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी झडती:
पाऊस पडला गार पाण्याचा,
सण आला माझ्या राजाचा!
खिशात नाही दाणा, अन म्हणे मी राजाचा राणा,
तरीही साजरा करू माझ्या
बैलांचा सण शहाणा.



# डिजिटल क्रॉप सर्व्हे तीन दिवसांत ५० टक्के पूर्ण करा : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

## सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांनी काटेकोर नियोजन करण्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यात डिजिटल क्रॉप सर्व्हेचे काम सध्या केवळ १८ टक्के झाले असून, पुढील तीन दिवसांत हे काम किमान ५० टक्क्यांपर्यंत पूर्ण करण्यासाठी सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांनी काटेकोर नियोजन करावे. डिजिटल क्रॉप सर्व्हेसाठी तलाठ्यांनी सहकार्य करणे आवश्यक असून, सर्वेक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी तालुकास्तरीय तलाठी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली डिजिटल क्रॉप सर्वे, संभाव्य दुष्काळ परिस्थिती, बळीराजा पानंद शेत रस्ते, मुख्यमंत्री कृषी सौर वाहिनी योजना, आदी योजनांचा आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, सुशांत बनसोडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) आशिष लोकरे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, उजनी धरण व्यवस्थापन चे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डिजिटल क्रॉप सर्व्हेच्या प्रगतीचा आढावा घेताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, अक्कलकोट, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यांमध्ये सर्वेक्षणाचे काम तुलनेने चांगले झाले आहे. मात्र, इतर तालुक्यांमध्ये कामाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. पुढील तीन दिवसांत जिल्ह्यातील डिजिटल क्रॉप सर्व्हे ५० टक्के पूर्ण होईल, या दृष्टीने सर्व तहसीलदारांनी प्रभावी नियोजन करून प्रत्यक्ष कामावर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच याच वेगाने पुढील काही दिवसातच हा सर्वे १००% पूर्ण झाला पाहिजे. हा सर्व्हे पूर्ण झाल्यानंतरच शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी गांभीर्यपूर्वक काम करावे असेही त्यांनी निर्देशित केले.

तलाठ्यांनी डिजिटल क्रॉप सर्व्हे साठी आवश्यक सहकार्य करावे. सर्वेक्षणाच्या कामात अडथळे येणार नाहीत, याची दक्षता घेऊन तहसीलदारांनी संबंधित तालुकास्तरीय तलाठी संघटनेच्या अध्यक्षांना बैठकीसाठी बोलावून सर्व तलाठ्यांना सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करण्याबाबत सूचित करावे. तसेच तलाठी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनाही बैठकीसाठी बोलावून त्यांना सहकार्य करण्याबाबत निर्देश देण्यात येतील, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.

**संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तात्काळ सर्वेक्षण अहवाल द्या**

संभाव्य दुष्काळाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व गावांचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडे तातडीने सादर करण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत. दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातून सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना उपविभागीय समितीच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

**टँकर मागणीचे प्रस्ताव आल्यास ४८ तासात मंजुरी देणे अनिवार्य**

त्यानुसार सर्व तहसीलदारांनी आपल्या तालुक्यातील सर्वेक्षणाचा अहवाल तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

उजनी धरण १०० टक्के भरलेले असले तरी जिल्ह्यातील अन्य ११ मध्यम प्रकल्पांपैकी सात प्रकल्पांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे संबंधित प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात पथके तैनात करून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे. तसेच अनधिकृत वीज जोडण्यांवर कारवाई करावी आणि यासाठी महावितरणने आवश्यक सहकार्य करावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

**प्रलंबित फार्मर आयडी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश**

ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करणे अनिवार्य आहे. ज्या तालुक्यांमध्ये फार्मर आयडीची कामे प्रलंबित आहेत, त्या ठिकाणी एकही फार्मर आयडी प्रलंबित राहणार नाही, याची संबंधित तहसीलदारांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

**प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दहा प्रशासकीय मान्यता**

'बळीराजा शेत पानंद रस्ता' योजनेंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दहा प्रशासकीय मान्यता आणि तीन कार्यारंभ आदेश देण्याच्या दृष्टीने प्रांताधिकारी व तहसीलदारांनी आवश्यक कार्यवाही करावी. सर्व संबंधितांनी प्रशासकीय मान्यता वेळेत घेऊन ठेवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले.

**सौर कृषी वाहिनीची कामे दोन दिवसांत मार्गी लावा**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील सादलापूर व आंधेवाडी खुर्द तसेच माढा तालुक्यातील उपळाई येथील प्रलंबित अडचणी संबंधित तहसीलदारांनी दोन दिवसांत सोडवून ही कामे मार्गी लावावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना हा मुख्यमंत्री महोदयांचा प्राधान्यक्रमातील उपक्रम असल्याने या कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई करू नये. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून प्रलंबित अडचणी तातडीने दूर कराव्यात, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**टँकरच्या प्रस्तावांना ४८ तासांत मंजुरी**

टंचाईच्या परिस्थितीत टँकरची मागणी करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ते तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत. टँकर मागणीच्या प्रस्तावांना ४८ तासांच्या आत मंजुरी देण्याचे नियोजन असल्याने सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांनी अत्यंत कार्यक्षमतेने काम करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी सांगितले.

सांगोला तालुक्यातील शिरभावी पाणीपुरवठा योजनेचे सुमारे १ कोटी ८५ लाख रुपये वीजबिल थकीत असल्याची माहिती महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे अधीक्षक अभियंता श्री. पाटील यांनी बैठकीत दिली. वीजबिलाची थकबाकी असल्यामुळे महावितरणकडून पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार ऑनलाईन द्वारे उपस्थित होते.

# पंढरपुरात 'विश्वबंधुत्व दिन' व 'स्व. सौ. पुष्पावती भिंगे स्मृती गुणवंत शिक्षक पुरस्कार' सोहळा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : अभिनव विवेकानंद व विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्था, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विश्वबंधुत्व दिन व्याख्यान समारंभ' आणि 'स्व. सौ. पुष्पावती शिवदास भिंगे स्मृती गुणवंत शिक्षक पुरस्कार' वितरण सोहळा अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि नेत्रदीपक वातावरणात पार पडला. हा सोहळा शुक्रवारी (दि. ११ सप्टेंबर २०२६) दुपारी ३ वाजता सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सौ. मैत्रेयी केसकर व श्री. दीपक इरकल सर यांच्या 'शिकागो व्याख्यान अभिवाचनाने' झाली. त्यानंतर विवेकानंद केंद्र कन्याकुमारीचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. बालकृष्णनजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत श्री. शशिकांत घाडगे सर यांनी केले, तर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. डॉ. सचिन लादे सर यांनी प्रास्ताविक मांडले, तर श्री. सुनील कोरे सर यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला.

**गुणवंत शिक्षकांचा गौरव:**

या सोहळ्यात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'स्व. सौ. पुष्पावती शिवदास भिंगे स्मृती गुणवंत शिक्षक पुरस्कारा'ने गौरव करण्यात आला : उच्च शिक्षण स्तरावरील गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राचार्य डॉ. कैलास करांडे (प्राचार्य, सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी), माध्यमिक शिक्षण स्तरावरील पुरस्कार श्री. दीपक इरकल (सहशिक्षक, लोकमान्य विद्यालय, पंढरपूर) यांना तर प्राथमिक शिक्षण स्तरावरील पुरस्कार डॉ. सौ. मैत्रेयी केसकर (सहशिक्षिका, आदर्श प्राथमिक विद्यालय, पंढरपूर) यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. तीनही पुरस्कारार्थी यांच्या कार्य आणि कर्तृत्वाचा परिचय दृक श्राव्य माध्यमातून अत्यंत सुंदर करून दिला.

पुरस्कारार्थींच्या वतीने प्रा. डॉ. कैलास करांडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच डॉ. सौ. प्रिया भिंगे मॅडम यांनीही आपले विचार मांडले.

या प्रसंगी 'स्वामी विवेकानंदांचे विश्वव्यापी विचार' या विषयावर बोलताना प्रमुख वक्ते मा. श्री. सचिन जगन्नाथ शिंदे (अभ्यासू वक्ते, लेखक व विचारवंत) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंदांचे विचार हे मानवतेला जोडणारे आणि तरुणांना प्रेरणा देणारे आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. या सोहळ्यास विवेकानंद केंद्राचे मार्गदर्शक मा. श्री. शिवदास धों. भिंगे (गुरुजी), विठाई संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे नेटके आणि प्रभावी सूत्रसंचालन श्री. सोमनाथ गायकवाड व सौ. कीर्तीताई मोरे मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार श्रीम. महानंदा डोंबाळे मॅडम यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी ओहोळ, राम मोरे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी सर, डॉ. प्रविदत्त वांगीकर सर, डॉ. महेश भिंगे सर, आनंद नगरकर, सुनील जगताप बाळकृष्ण डिंगरे, प्रवीण देशपांडे, संजय कुलकर्णी, रामेश्वर कोरे, कविता गायकवाड, मंदार केसकर, अंजू सूनगार, ज्योतिर्लिंग गायकवाड, सिद्धी केसकर, पार्थ गायकवाड, दिपाली सतपाल आदींनी परिश्रम घेतले.

# अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन; १५ सप्टेंबरपासून विशेष मोहीम

सोलापूर, (जिमाका) : सन २०२६-२७ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना - 'प्रति थेंब अधिक पिक' (सूक्ष्म सिंचन) योजनेअंतर्गत अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून ठिबक सिंचन व तुषार सिंचनासाठी दि. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करून अर्ज सादर करावा. अर्ज भरताना आवश्यक माहिती अचूकपणे भरावी. चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरल्यास अर्ज रद्द होण्याची शक्यता आहे.

**आवश्यक कागदपत्रे –**

ग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक आणि जातीचा दाखला.

या योजनेचा लाभ ५ हेक्टर क्षेत्रापर्यंत देण्यात येणार आहे. पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांवर 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. अर्जांची महाडीबीटी पोर्टलवर संगणकीय सोडत काढण्यात येईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे माहिती देण्यात येईल.

पूर्वसंमती मिळाल्यानंतर नोंदणीकृत कंपनीच्या अधिकृत वितरकाकडून सूक्ष्म सिंचन संचाची खरेदी करता येईल. संच बसविल्यानंतर उपविभागीय कृषी अधिकारी यांच्यामार्फत मोका तपासणी होईल आणि त्यानंतर शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येईल.

योजनेच्या अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी किंवा सामाईक सेवा केंद्राशी (सीएससी) संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावेत : अपर जिल्हाधिकारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत दाखल असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, तसेच पीडितांना शासन नियमानुसार अर्थसहाय्य वेळेत उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांच्या वतीने आयोजित जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.

बैठकीस सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, नागरी हक्क संरक्षण पथकाचे सचिन वसमळे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे, अधीक्षक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सुधाकर भांगरे, जिल्हा समन्वयक सचिन मोरे, तसेच समितीचे अशासकीय सदस्य अरुण तोरप्पा क्षीरसागर, मोहन बाबासाहेब गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी समितीच्या अशासकीय सदस्यांना समितीची नियमावली आणि संबंधित शासन निर्णयांची सविस्तर माहिती देण्याच्या सूचना केल्या. समितीच्या कामकाजाबाबत सदस्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सूचनांचा योग्य पद्धतीने विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस विभागाकडे प्रलंबित असलेली प्रकरणे तपासाच्या दृष्टीने तातडीने मार्गी लावावीत. पीडितांना न्याय मिळण्यासाठी प्रकरणांचा पाठपुरावा प्रभावीपणे करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

प्रारंभी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त श्रीमती सोनवणे यांनी बैठकीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती तसेच विषय सूची सादर केली. बैठकीत ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंतचा अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ व सुधारित अधिनियम, २०१५ अंतर्गत जिल्ह्यात घडलेल्या अत्याचाराच्या घटना व दाखल गुन्ह्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच शहरी व ग्रामीण पोलीस विभागाकडे दाखल झालेली आणि प्रलंबित प्रकरणे, न्यायालयात निर्णयासाठी प्रलंबित असलेली प्रकरणे, अत्याचारग्रस्त पीडितांना देण्यात आलेले अर्थसहाय्य, प्राप्त अनुदान तसेच समितीच्या अशासकीय सदस्यांनी केलेल्या सूचनांवरही चर्चा करण्यात आली.

**ह.भ.प. श्री दामुअण्णा महाराज शिंगणे यांची जिल्हाअधिकारी यांच्याकडे मागणी**

**विविध मागण्यांचे दिले निवेदन**

# शेंदुरजन येथे लखुजीराजे जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ शासकीय कला महोत्सवाचे आयोजन करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

राष्ट्रमाता जिजाऊंचे वडील महापराक्रमी लखुजी राजे जाधव यांच्या स्मृतीप्रत्यर्थ मातृतिर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुरजन येथे भव्य शासकीय कला महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे, अशी आग्रही मागणी ह. भ. प. श्री दामुअण्णा महाराज शिंगणे यांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. जिल्ह्यातील गरजू व पात्र कलावंतांना मानधनासाठी आवश्यक असलेले शासकीय प्रमाणपत्र मिळावे, यासाठी हा महोत्सव तातडीने भरवण्यात यावा, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

> **जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांतील कलाकारांच्या भवितव्याचा आणि त्यांच्या हक्काचा विचार करून प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घ्यावी आणि लवकरात लवकर शेंदुरजन येथे जिल्हास्तरीय शासकीय कला महोत्सवाचे आयोजन करावे.**
>
> **– ह. भ. प. दामुअण्णा महाराज शिंगणे**
>
> सदस्य : राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन शासकीय समिती बुलढाणा जिल्हा

**ज्येष्ठ कलावंत मानधनापासून अनेक कलाकार वंचित**

बुलढाणा जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय कला महोत्सवाचे आयोजन झाले नाही. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या 'ज्येष्ठ कलावंत मानधन योजने'चा लाभ घेण्यासाठी कलावंतांकडे शासकीय कार्यक्रमात सहभाग घेतल्याचे किंवा सादरीकरण केल्याचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य असते. मात्र, जिल्ह्यात दीर्घकाळापासून असा कोणताही शासकीय मंच उपलब्ध न झाल्याने अनेक गुणवंत व गरजू कलावंतांकडे हे प्रमाणपत्र उपलब्ध नाही. परिणामी, वयाच्या उत्तरार्धात हक्काच्या शासकीय मानधनापासून अनेक ज्येष्ठ कलावंत वंचित राहत आहेत.

**महोत्सावाचे महत्त्व आणि मागणीतील प्रमुख मुद्दे:**

**कलावंतांना शासकीय प्रमाणपत्र:** जिल्हास्तरीय शासकीय कला महोत्सव आयोजित केल्यास गायन, वादन, नाट्य, लोककला, शाहिरी, आणि इतर विविध क्षेत्रांतील गुणवंत कलावंतांना आपली कला सादर करण्याची संधी मिळेल व शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र प्राप्त होईल.

**मानधनाचा मार्ग सुलभ:** अधिकृत प्रमाणपत्र मिळाल्याने गरजू कलावंतांना शासकीय मानधनाच्या योजनेसाठी अर्ज करणे अत्यंत सोपे व सोयीचे होणार आहे.

**ऐतिहासिक स्मृतींना उजाळा:** लखुजी राजे जाधव यांच्या पराक्रमी इतिहासाला अभिवादन म्हणून शेंदुरजन या ऐतिहासिक भूमीत या कला महोत्सवाचे आयोजन करणे संयुक्तिक ठरेल.